समुद्री उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण
(वाणिज्य एवं उद्योग मंत्रालय, भारत सरकार)
एम पी ई डी ए भवन, पनंपिल्ली एवन्यू
डाक पेटी सं. 4272, कोच्ची-682036, भारत
The Marine Products Export Development Authority
(Ministry of Commerce & Industry, Govt. of India)
MPEDA House, Panampilly Avenue
P.B. No. 4272, Kochi-682 036, India

फोन Phone: 2311979, 2311901, 2311854, 2311803, 2313415, 2314468, 2315065
फैक्स Fax: 91-484-2313361
E-mail: ho@mpeda.gov.in
Website: www.mpeda.com

प्रसिद्धी वृत्त

एमपीईडीएच्या चिखलातील खेकडे बीज निर्मिती केंद्र तंत्रज्ञानाला 20 वर्षांसाठी पेटंटचा अधिकार प्राप्त

- वैविध्यपूर्ण जल संवर्धनासाठी आणि समुद्रीय निर्यातीला ह्या तंत्रज्ञानामुळे बळकटी मिळणार: एमपीईडीए अध्यक्ष

कोची, 17 मे: भारताच्या जल संवर्धन क्षेत्रातील लक्षणीय प्रगतीदर्शक ठरलेल्या घटनेमध्ये एमपीईडीए-आरजीसीएच्या व देशातील एकमेव अशा चिखलातील खेकडे बीज निर्मिती केंद्र तंत्रज्ञानाला भारत सरकारच्या पेटंट, डिझाईन आणि ट्रेड मार्क्सच्या महानियंत्रकांनी 2011 ते 2030 असे 20 वर्षांसाठी पेटंट दिले आहे.

चिखलातील खेकड्यांसाठी (वैज्ञानिक नाव- *Scylla serrata*) बीज निर्मिती तंत्रज्ञान राजीव गांधी सेंटर फॉर एक्वाकल्चर (आरजीसीए) ह्या मरीन प्रोडक्ट्स एक्स्पोर्ट डेव्हलपमेंट ऑथोरिटीच्या (एमपीईडीए) संशोधन व विकास विभागाद्वारे विकसित केले गेले आहे. दक्षिण पूर्व आशियायी देशांमध्ये चिखलातील खेकड्यांना अतिशय मागणी आहे, ह्या भागामध्ये स्वादिष्ट समुद्री खाद्य म्हणून जीवंत खेकड्यांना अतिशय प्राधान्य दिले जाते.

एमपीईडीए अध्यक्ष श्री के एस श्रीनिवास ह्यांनी म्हंटले आहे की, भारतीय जल संवर्धन क्षेत्राच्या इतिहासामधील ही उल्लेखनीय उपलब्धी आहे, कारण पहिल्यांदाच केंद्र सरकारने देशातील ह्या तंत्रज्ञानासाठी पेटंट दिले आहे.

"फक्त श्रिंप (कोळंबी) शेतीवर भर देण्याऐवजी जल संवर्धना मधील अन्य विविध प्रजातींकडे वळण्याचा हेतु असलेल्या शेतक-यांच्या बीज आवश्यकतेला पूर्ण करण्यामध्ये ते अतिशय उपयोगी ठरेल. ह्या कामामध्ये मदत करणा-या देशातील जल संवर्धकाना आणि ह्या प्रेरणादायी उद्दिष्टाला प्राप्त करण्यासाठी अथक कार्य करणा-या आरजीसीएच्या युवा वैज्ञानिकांना एमपीईडीए ही उपलब्धी समर्पित करत आहे," असे आरजीसीएचेही अध्यक्ष असलेल्या श्री श्रीनिवास ह्यांनी म्हंटले.

भारतामध्ये चिखलातील खेकड्यांसाठी अन्य कोणतेही बीज निर्मिती केंद्र नाही, हे लक्षात घेऊन आरजीसीएने 2011 मध्ये भारत सरकारच्या पेटंट, डिझाईन आणि ट्रेड मार्क्सच्या महानियंत्रकांकडे चिखलातील खेकड्यांच्या बीज निर्मिती केंद्र तंत्रज्ञानाच्या पेटंट अधिकाराचा अर्ज केला होता.

परंतु, अतिशय दीर्घ व खडतर प्रक्रियेनंतर हे पेटंट देण्यात आले आहे. जगातील विविध संशोधन संस्थांनी ह्या विषयावर प्रसिद्ध विशेषज्ञांसोबत चर्चा केली व त्यांनी अनेक संशोधन संदर्भ दिले व आरजीसीएचे वैज्ञानिक ह्यांच्यासह तथ्य व आकडेवारीसंदर्भात अनेक बैठका केल्या. अनेक मुद्द्यांना प्रमाणित केल्यानंतर भारतात एकमेव असलेल्या एमपीईडीए- आरजीसीएच्या बीज निर्मिती तंत्रज्ञानाला 20 वर्षांसाठी पेटंट अधिकार देण्याचा निर्णय घेण्यात आला.

चिखलातील खेकड्यांची अतिशय मोठी मागणी व विशेषत: दक्षिण पूर्व आशियायी देशांमधली मागणी लक्षात

समुद्री उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण
(वाणिज्य एवं उद्योग मंत्रालय, भारत सरकार)
एम पी ई डी ए भवन, पनंपिल्ली एवन्यू
डाक पेटी सं. 4272, कोच्ची-682036, भारत
The Marine Products Export Development Authority
(Ministry of Commerce & Industry, Govt. of India)
MPEDA House, Panampilly Avenue
P.B. No. 4272, Kochi-682 036, India

फोन Phone : 2311979, 2311901, 2311854, 2311803, 2313415, 2314468, 2315065
फैक्स Fax : 91-484-2313361
E-mail : ho@mpeda.gov.in
Website : www.mpeda.com

घेता, एमपीईडीएने 2004 मध्ये चिखलातील खेकड्यांच्या बीजाचा (क्रॅब इन्स्टार म्हणून ओळखला जाणारा) प्रायोगिक प्रकल्प हाती घेतला होता व त्यानुसार 2013 मध्ये भारतात पहिल्यांदा व्यावसायिक पद्धतीचे बीज निर्मिती केंद्र सुरू केले होते व त्यामध्ये दर वर्षी दहा लाख इतकी क्षमता होती. वाढत्या मागणीमुळे आरजीसीएच्या चिखलातील खेकड्यांच्या बीज निर्मिती केंद्रातील बीज क्षमता दर वर्षी 1.4 दशलक्ष इतकी वाढली आहे.

एक्वाकल्चर डिव्हिजन ऑफ इंटरनॅशनल इन्स्टिट्युट म्हणजेच साउथईस्ट एशियन फिशरीज डेव्हलपमेंट सेंटर (एसईएएफडीईसी), फिलिपाईन्सच्या प्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. एमिलिया टी. क्विन्टिओ ह्यांनी आरजीसीएला 2013 पर्यंत सल्लागार सेवा दिली होती. त्यानंतर थोड्या कालावधीमध्ये आरजीसीएच्या वैज्ञानिकांनी ह्या तंत्रज्ञानाला मानकानुसार प्रमाणित केले आहे.

एमपीईडीए अध्यक्षांनी म्हंटले की, जगामध्ये इन्स्टार खेकड्यांच्या सर्व्हायव्हल (जगण्याचे प्रमाण) चा तीन टक्के इतका विक्रम असताना तो सात टक्के इतका वाढवणे ही अतिशय मोठी प्राप्ती आहे. तसेच, हे बीज निर्मिती केंद्र अशाप्रकारे बनवले गेले आहे कि संपूर्ण केंद्र जैव सुरक्षितता उपायांसह सर्व विभाग हे एका छताखाली आहेत. आत्तापर्यंत 7.28 दशलक्ष बीज उत्पादित केले गेले आहे आणि ते देशातील 659 शेतकऱ्यांना पाठवले गेले आहे.

जिताडा, चिखलातील खेकडे, जनुकीय सुधारित फार्म्ड तिलापिया (गिफ्ट - जीआयएफटी), कोबिया, पोम्पानो आणि आर्टेमिया अशा अनेक जल संवर्धन प्रजातींच्या व्यापारीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आरजीसीएची स्थापना करण्यात आली होती. जल संवर्धनातील मुख्य घटक असलेल्या दर्जेदार गुणवत्तेच्या बीज निर्मिती व पुरवठ्याद्वारे भारतातील समुद्री उत्पादन निर्यात वाढवण्यावर त्यांचा भर आहे.

“एमपीईडीए-आरजीसीएला भारतातील जल संवर्धनाच्या विविध प्रकल्पांच्या प्रसारासाठी व अंमलबजावणीसाठी सतत दिलेल्या सहाय्याबद्दल केंद्र सरकारच्या वाणिज्य व मत्स्य विभाग यांना तसेच इंडियन काउंसिल ऑफ एग्रीकल्चर रिसर्च (आयसीएआर) यांना आम्ही धन्यवाद देऊ इच्छितो,” असे श्री. श्रीनिवास ह्यांनी म्हंटले.

समाप्त